# Welcome

## To

## Department of Marathi

मराठी विभागाच्या वतीने हार्दिक स्वागत

**(DEPARTMENT PROFILE)**







नवयुवक शिक्षण प्रसारक  मंडळ चापोली द्वारा संचलित

# संजीवनी महाविद्यालय, चापोली

ता.चाकूर जि. लातूर **413513**

फोन - **02381&257751**

# मराठी विभागाची रूपरेषा

**(DEPARTMENT PROFILE)**

नॅक मूल्यांकन

**2015-2020**

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग


## Establishment-1999





**Mahatma Bashweshwar** **Sant Dnyaneshwar** **Sant Tukaram**



**V. S. Khandekar**
**Gyanpeeth Award :1974**

**V. V. Shirwadkar**
**Gyanpeeth Award :1987**

**Vinda. Karandikar**
**Gyanpeeth Award :2003**

**Bhalchandra Nemade**
**Gyanpeeth Award :2014**

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग




प्राचार्य डॉ. धनंजय चाटे सरांचा सत्कार करतांना प्रा.डॉ.विजयकुमार ढोले



विभागप्रमुख
प्रा. डॉ. विजयकुमार शिवदास ढोले



सहाय्यक
प्रा.डॉ. नामदेव बापूराव सोडगीर

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

# मराठी विभागाची रूपरेषा

## प्रस्तावना (Introduction)

मराठी विभागाची स्थापना महाविद्यालयाच्या स्थापनेबरोबरच जून /जुलै 1999 साली झाली. मराठी विभाग महाविद्यालयातील महत्त्वपूर्ण भाषा विभाग आहे. मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा व राजभाषा आहे. येथे विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण मराठी भाषेतूनच दिले जाते. मराठी ही विद्यार्थ्यांची मातृभाषा असल्यामुळे तिच्याविषयी जिव्हाळा, प्रेम व आपुलकी असते. या विभागातंर्गत ऐच्छिक मराठी व द्वितीय भाषा मराठी अशा स्वरुपात अभ्यासक्रम अध्यापन केला जातो.

मराठी विभागात दोन प्राध्यापक पूर्णवेळ कार्यरत असून डॉ. विजयकुमार शिवदास ढोले हे विभाग प्रमुख व सहाय्यक प्राध्यापक आहेत व डॉ. नामदेव बापूराव सोडगीर हे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. संजीवनी महाविद्यालय हे ग्रामीण भागातील महाविद्यालय आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व सर्वांगिण विकास करणे हे महाविद्यालयाचे उद्दिष्ट आहे. यानुसार मराठी विभाग सतत कार्यशील आहे. मराठी विभागातर्फे विद्यार्थ्यांना भाषा, व्याकरण, साहित्य, विविध वाङ्मयप्रकार, व्यवहाज्ञान, भाषाविज्ञान व प्रसारमाध्यमे इत्यादी सर्व साहित्य प्रकाराचे सखोल व परिपूर्ण ज्ञान दिले जाते.

साहित्य हे समाजाचे प्रतिनिधित्व करते ही भूमिका समोर ठेवून साहित्य व भाषेची आवड निर्माण करण्याचे कामही मराठी विभाग विद्यार्थ्यासाठी करत असतो. मराठी साहित्य प्रकाराच्या अध्यापनातून व्यक्ती, साहित्य, समाज व संस्कृती यांची वीण भक्कम करण्याचा प्रयत्न केला जातो. मराठी विभागातर्फे विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्यपूर्ण, संस्कारक्षम व नैतिकमूल्य परिपूर्ण असे बनवले जाते.

मराठी विभागामार्फत वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्या माध्यमातून विद्यार्थी व समाजाचा विकास घडविला जातो. विद्यार्थ्यांमध्ये समाज व राष्ट्रप्रेम निर्माण केले जाते. स्पर्धा परीक्षेचे व संशोधनाचे मार्गदर्शनही विद्यार्थ्यांना केले जाते. जेणेकरून विद्यार्थी हा रोजगारभिमुख बनविण्याचे कार्य मराठी विभागातर्फे केले जाते. एकूणच मराठी विभाग हा महाविद्यालयातील महत्त्वपूर्ण विभाग आहे.

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## Vision (ध्येय)

- ❖ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा गुणात्मक, शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकास करणे
- ❖ मराठी विषयाचे व सर्व वाङ्मय प्रकाराचे सखोल व परिपूर्ण ज्ञान देणे.
- ❖ साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्य शिक्षणाची रूजवणूक करणे व त्यांच्यात मराठी भाषा व राष्ट्रप्रेम निर्माण करणे.
- ❖ भाषिक कौशल्याचे ज्ञान देणे.
- ❖ शिक्षक, कवी, नाटय, अभिनय, स्पर्धा परीक्षा व प्रसार माध्यम इ. क्षेत्रातील नोकरीच्या संधीसाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करून स्वंयपूर्ण बनवणे.

## Mission (उद्दिष्टे)

- ❖ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व सर्वांगिण विकास या महाविद्यालयाच्या उद्दिष्टाची पूर्ती करणे.
- ❖ राजभाषा मराठी विषयी विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम निर्माण करणे.
- ❖ विद्यार्थ्यांत मूल्यशिक्षण रूजविणे व भाषिक कौशल्याचा विकास करणे.
- ❖ भाषा व साहित्याद्वारे व्यक्ति व समाज घडविणे.
- ❖ साहित्य, संस्कृती व समाज यांची सांगड घालणे.
- ❖ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे.
- ❖ तौलनिक भाषा अभ्यास करण्यास मदत करणे.

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## मराठी विभागातील अभ्यास उपक्रम

| अ. क्र. | वर्ग | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1. | बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम. प्रथम व द्वितीय वर्ष | द्वितीय भाषा मराठी | 02 वर्षे |
| 2. | बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष | मराठी ऐच्छिक | 03 वर्षे |
| 3. | बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम. द्वितीय व तृतीय वर्ष | मराठी कौशल्ये विकास (SEC) | 02 वर्षे |
| 4. | पीच.डी. संशोधन मार्गदर्शक | संशोधन | 04 वर्षे |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## अभ्यासक्रमाचे नियोजन (Planning for Curriculum Delivery)

❖ **मराठी विभागामध्ये दोन प्राध्यापक पूर्णवेळ कार्यरत आहेत. त्यानुसार वर्षभरातील विभागामार्फत अभ्यासक्रमाचे व विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.**

- शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विभागातील प्राध्यापकांची बैठक घेतली जाते.
- बैठकीमध्ये विभागाचे वेळापत्रक प्रारंभी तयार केले जाते.
- प्राध्यापकांच्या अभ्यासपत्रिकेचे वाटप केले जाते.
- वैयक्तिक अभ्यास पत्रिकेनुसार वैयक्तिक वेळापत्रक तयार केले जाते.
- वर्षभरातील विविध कार्यक्रमांचे वार्षिक कॅलेंडर तयार केले जाते.
- विद्यार्थ्यांना तासिका सुरू झाल्याची सूचना नोटीस बोर्डावर लावली जाते.
- नंतर रीतसर प्रत्यक्ष अध्यापन व विविध कार्यक्रमाचे आयोजन वर्षभर केले जाते.

## अध्यापन पध्दती

- व्याख्यान पध्दत
- चर्चात्मक पध्दत
- गटचर्चा व चर्चासत्र
- विस्तार व्याख्यान पध्दत
- बहुपर्यायी  वस्तूनिष्ठ प्रश्नांची तयारी
- DVD/ CD व PPT द्वारे अध्यापन
- ऑनलाईन अध्यापन

## विद्यार्थी मूल्यमापन पध्दती

- महाविद्यालयीन अंतर्गत मूल्यमापन – 25 गुण (प्रत्येक पेपर)
- चाचणी परीक्षा
- चर्चासत्र / गटचर्चा
- गृहपाठ
- विद्यापीठ स्तरीय सत्र परीक्षा मूल्यमापन -50 गुण (प्रत्येक पेपर)
- विद्यापीठ स्तरीय सेमिस्टर परीक्षा

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## मराठी विषयातील पदवी वर्गाचा अभ्यासक्रम शै.वर्ष 2015-18

| वर्ग | अभ्यासपत्रिका क्रमांक | अभ्यासपत्रिकेचे नाव |
|---|---|---|
| बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. प्रथम वर्ष | मराठी (द्वितीय भाषा) पेपर-1 व 2 | पे- I & II - साहित्यगाथा (भाग 1 व 2 ) |
| बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.द्वितीय वर्ष | मराठी (द्वितीय भाषा) पेपर-3 व 4 | पे- III & IV - साहित्यधारा (भाग 1 व 2 ) |
| बी.ए.- प्रथम वर्ष | ऐच्छिक मराठी पेपर क्र – 1 व ३<br>ऐच्छिक मराठी पेपर क्र – 2 व 4 | पे- I & III आधुनिक मराठी गद्य वाङमय<br>पे- II & IV आधुनिक मराठी कविता |
| बी.ए.- द्वितीय वर्ष | ऐच्छिक मराठी पेपर क्र – 5 व 7<br>ऐच्छिक मराठी पेपर क्र – 6 व 8<br>मराठी कौशल्य विकास (SEC) 1 व 2 | पे-V आधुनिक वाङमय प्रकार: आत्मचरित्र<br>पे-VII आधुनिक वाङमय प्रकार: कादंबरी<br>पे- VI आधुनिक वाङमय प्रकार: नाटक<br>पे- VIII मध्ययुगीन गद्य-पद्याचा अभ्यास<br>पे- I मराठी भाषिक कौशल्य : संभाषण कौशल्य<br>पे- II मराठी भाषिक कौशल्य : लेखन कौशल्य |
| बी.ए.- तृतीय वर्ष | ऐच्छिक मराठी पेपर क्र – 9 व 11<br>ऐच्छिक मराठी पेपर क्र – 10 व 12<br>मराठी कौशल्य विकास (SEC) 3 व 4 | पे- IX व पे- XI मध्ययुगीन मराठी वाङ्याचा इतिहास<br>पे- X साहित्यविचार & पे- XII भाषाविज्ञान आणि व्याकरण<br>पे- III व पे- IV मराठी भाषिक कौशल्य विकास भाग -1 व 2 |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## मराठी विषयातील पदवी वर्गाचा अभ्यासक्रम शै.वर्ष 2018-21

| वर्ग | अभ्यासपत्रिका क्रमांक | अभ्यासपत्रिकेचे नाव |
|---|---|---|
| बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. प्रथम वर्ष | मराठी (द्वितीय भाषा) पेपर-1 व 2 | पे- I अक्षरलेणी & पे- II साहित्यशिल्प |
| बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.द्वितीय वर्ष | मराठी (द्वितीय भाषा) पेपर-3 व 4 | पे- III अक्षरविद्या & पे. – IV साहित्यसरीता |
| बी.ए.- प्रथम वर्ष | ऐच्छिक मराठी पेपर क्र – 1 व ३<br>ऐच्छिक मराठी पेपर क्र – 2 व 4 | पे- I आधुनिक मराठी कथावाङ्मय & पे- III मराठी कथात्मक साहित्य<br>पे- II मध्ययुगीन आणि आधुनिक मराठी पद्य वाङ्मय & पे- IV आधुनिक मराठी कविता |
| बी.ए.- द्वितीय वर्ष | ऐच्छिक मराठी पेपर क्र – 5 व 7<br>ऐच्छिक मराठी पेपर क्र – 6 व 8<br>मराठी कौशल्य विकास (SEC) 1 व 2 | पे-V निवडक मराठी गद्य & पे-VII निवडक कादंबरी वाङ्मय<br>पे- VI मराठी नाटयात्मक साहित्य & पे- VIII वैचारिक साहित्य<br>पे- I मराठी भाषिक कौशल्य : संभाषण कौशल्य<br>पे- II मराठी भाषिक कौशल्य : लेखन कौशल्य |
| बी.ए.- तृतीय वर्ष | ऐच्छिक मराठी पेपर क्र – 9 व 11<br>ऐच्छिक मराठी पेपर क्र – 10 व 12<br>मराठी कौशल्य विकास (SEC) 3 व 4 | पे- IX व पे- XI मध्ययुगीन मराठी वाङ्याचा इतिहास<br>पे- X साहित्यविचार & पे- XII भाषाविज्ञान आणि व्याकरण<br>पे- III व पे- IV मराठी भाषिक कौशल्य विकास भाग -1 व 2 |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

### प्राध्यापकांचे अभ्यासक्षेत्रनिहाय अभ्यासपत्रिकेचे वाटप व नियोजन

**डॉ. विजयकुमार शिवदास ढोले :-**

**अभ्यासक्षेत्र :- प्रादेशिक कादंबरी**

**अभ्यासक्रम :- 1.** पे- III अक्षरविद्या & पे. – IV साहित्यसरीता (SL मराठी)

**2.** पे- I आधुनिक मराठी कथा वाङ्मय & पे- III मराठी कथात्मक साहित्य (मराठी ऐच्छिक)

**3.** पे- VI मराठी नाटयात्मक साहित्य & पे- VIII वैचारिक साहित्य (मराठी ऐच्छिक)

**4.** पे- I मराठी भाषिक कौशल्य : संभाषण कौशल्य & पे- II मराठी भाषिक कौशल्य : लेखन कौशल्य (मराठी SEC)

**5.** पे- X साहित्यविचार & पे- XII भाषाविज्ञान आणि व्याकरण (मराठी ऐच्छिक)

**डॉ. नामदेव बापूराव सोडगीर :-**

**अभ्यासक्षेत्र :- ग्रामीण साहित्य**

**अभ्यासक्रम :- 1.** पे- III अक्षरलेणी & पे. – IV साहित्यशिल्प (SL मराठी)

**2.** पे- II मध्ययुगीन आणि आधुनिक मराठी पद्य वाङ्मय & पे- IV आधुनिक मराठी कविता (मराठी ऐच्छिक)

**3.** पे-V निवडक मराठी गद्य & पे-VII निवडक मराठी कादंबरी वाङ्मय (मराठी ऐच्छिक)

**4.** पे- IX व पे- XI मध्ययुगीन मराठी वाङ्याचा इतिहास (मराठी ऐच्छिक)

**5.** पे- III व पे- IV मराठी भाषिक कौशल्य विकास भाग -1 व 2 (मराठी SEC)



डॉ. विजयकुमार ढोले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना



डॉ नामदेव सोडगीर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## Integration of cross – Cutting Issues into curriculum
## (क्रॉस कटिंग समस्यांचे अभ्यासक्रमात एकिकरण)

- **सर्व अभ्यासपत्रिकेच्या अभ्यासक्रमातून खालील ज्वलंत प्रश्नांचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते व विद्यार्थी सर्वगुण संपन्न बनविण्यासाठी प्रयत्न केला जातो.**

  - 'मध्ययुगीन मराठी वाङमयाचा इतिहास' या अभ्यासपत्रिकेतून स्त्री – पुरूष समानता, पर्यावरण संरक्षण, नैतिकमूल्ये शिक्षण यांचे परिपूर्ण ज्ञान दिले जाते.
  - कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र व आत्मचरित्र इ. वाङ्मयाच्या अभ्यासातून मानवी हक्काची जाणिव होते.
  - व्यक्ती, समाज, राष्ट्र व संस्कृती या विषयीचे प्रेम विद्यार्थ्याच्या मनात जागृत केले जाते.
  - संघर्षातून व्यक्तिची जडण - घडण कशी होते ते समजते.
  - संकट काळात मदत करण्याची उदात्त किंवा परोपकाराची भावना निर्माण होते.
  - साहित्याच्या अभ्यासातून साहित्य व समाज, साहित्य व राष्ट्र याची भक्कम वीण निर्माण होते. विद्यार्थ्याच्या मनात स्वातंत्र्य, समता, बंधूता, मानवता, राष्ट्रप्रेम व विश्वप्रेम निर्माण होते.

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## मराठी विभागातील विद्यार्थी संख्या (मराठी - S.L.)

| अ.क्र. | वर्ष | अभ्यासक्रमाचे नाव | विद्यार्थी संख्या | विद्यार्थ्यांचे प्राध्यापकनिहाय प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 01 | **2015 - 16** | बी.ए.प्रथम वर्ष | 88 | **प्राध्यापकांची संख्या : - 2** |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 48 | |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 54 | **विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 108** |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 26 | |
| | | **एकूण** | **216** | |
| 02 | **2016-17** | बी.ए.प्रथम वर्ष | 92 | **प्राध्यापकांची संख्या : - 2** |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 64 | |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 62 | **विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 149** |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 47 | |
| | | **बी.कॉम.प्रथम वर्ष** | 34 | |
| | | **एकूण** | **299** | |
| 03 | **2017-18** | बी.ए.प्रथम वर्ष | 94 | **प्राध्यापकांची संख्या : - 2** |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 40 | |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 116 | **विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 184** |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 44 | |
| | | **बी.कॉम.प्रथम वर्ष** | 50 | |
| | | **बी.कॉम.द्वितीय वर्ष** | 24 | |
| | | **एकूण** | **368** | |
| 04 | **2018-19** | बी.ए.प्रथम वर्ष | 90 | **प्राध्यापकांची संख्या : - 2** |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 38 | |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 97 | **विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 197** |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 97 | |
| | | **बी.कॉम.प्रथम वर्ष** | 34 | |
| | | **बी.कॉम.द्वितीय वर्ष** | 38 | |
| | | **एकूण** | **394** | |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर


## मराठी विभाग

| अ.क्र. | वर्ष | अभ्यासक्रमाचे नाव | विद्यार्थी संख्या | विद्यार्थ्यांचे प्राध्यापकनिहाय प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 05 | 2019-20 | बी.ए.प्रथम वर्ष | 52 | **प्राध्यापकांची संख्या : - 2** |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 24 | |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 51 | **विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 98** |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 24 | |
| | | **बी.कॉम.प्रथम वर्ष** | 23 | |
| | | **बी.कॉम.द्वितीय वर्ष** | 23 | |
| | | **एकूण** | **197** | |
| 06 | 2020-21 | बी.ए.प्रथम वर्ष | 32 | **प्राध्यापकांची संख्या : - 2** |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 24 | |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 20 | **विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 81** |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 54 | |
| | | **बी.कॉम.प्रथम वर्ष** | 13 | |
| | | **बी.कॉम.द्वितीय वर्ष** | 20 | |
| | | **एकूण** | **163** | |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग


**मराठी (S.L. ) विद्यार्थी संख्येचा आलेख**



# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

**B.A./ B.Sc./ B. Com. F.Y. & S.Y. Marathi (S.L.) विद्यार्थी संख्या व आलेख**




| Year | 2015-2016 | 2016-2017 | 2017-2018 | 2018-2019 | 2019-2020 | 2020-2021 |
|---|---|---|---|---|---|---|
| No. of Students | 216 | 299 | 368 | 394 | 197 | 163 |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग


## मराठी विभागातील विद्यार्थी संख्या (मराठी – Optional)

| अ.क्र. | वर्ष | अभ्यासक्रमाचे नाव | विद्यार्थी संख्या | विद्यार्थ्यांचे प्राध्यापकनिहाय प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 01 | 2015-16 | बी.ए.प्रथम वर्ष | 109 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 39 | |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 30 | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 89 |
| | | **एकूण** | **178** | |
| 02 | 2016-17 | बी.ए.प्रथम वर्ष | 101 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 70 | |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 41 | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 106 |
| | | **एकूण** | **212** | |
| 03 | 2017-18 | बी.ए.प्रथम वर्ष | 102 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 49 | |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 63 | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 107 |
| | | **एकूण** | **214** | |
| 04 | 2018-19 | बी.ए.प्रथम वर्ष | 125 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 37 | |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 33 | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 97 |
| | | **एकूण** | **195** | |
| 05 | 2019-20 | बी.ए.प्रथम वर्ष | 50 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 27 | |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 21 | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 49 |
| | | **एकूण** | **98** | |
| 06 | 2020-21 | बी.ए.प्रथम वर्ष | 33 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 35 | |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 22 | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 45 |
| | | **एकूण** | **90** | |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग


### मराठी (Optional) विद्यार्थी संख्येचा आलेख



# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

### B. A. F. Y. / S. Y. / T. Y. Marathi (Optional) विद्यार्थी संख्या व आलेख




| Year | 2015-2016 | 2016-2017 | 2017-2018 | 2018-2019 | 2019-2020 | 2020-2021 |
|---|---|---|---|---|---|---|
| No. of Students | 178 | 212 | 214 | 195 | 98 | 90 |


# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## मराठी विभागातील विद्यार्थी संख्या (मराठी  कौशल्ये विकास - SEC)

| अ.क्र. | वर्ष | अभ्यासक्रमाचे नाव | विद्यार्थी संख्या | विद्यार्थ्यांचे प्राध्यापकनिहाय प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 01 | 2017-18 | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम द्वितीय वर्ष | 26 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम तृतीय वर्ष | - | |
| | | **एकूण** | **26** | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 13 |
| 02 | 2018-19 | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम द्वितीय वर्ष | 32 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम तृतीय वर्ष | 15 | |
| | | **एकूण** | **47** | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 :  23 |
| 03 | 2019-20 | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम द्वितीय वर्ष | 08 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम तृतीय वर्ष | 15 | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 :  11 |
| | | **एकूण** | **23** | |
| 04 | 2020-21 | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम द्वितीय वर्ष | 09 | प्राध्यापकांची संख्या : - 2 |
| | | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम तृतीय वर्ष | 11 | विद्यार्थ्यांचे प्रमाण : 1 : 10 |
| | | **एकूण** | **20** | |

## (मराठी  कौशल्ये विकास - SEC) ) विद्यार्थी संख्येचा आलेख



# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

### मराठी विभागाचे अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर उपक्रम (Student – centric Activities)

- ❖ मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांचा नैतिक, गुणात्मक व व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी तसेच विद्यार्थ्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय प्रेम निर्माण होण्यासाठी मराठी विभागातर्फे विविध उपक्रम राबविले जातातवीर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हाना स्पविद्यार्थ्यां ., श्रमाची जाणीव व्हावी, भाषिक कौशल्याचे ज्ञान व्हावे, व्यवहार व उपयोजित मराठीचे ज्ञान व्हावे, यासाठी मराठी विभाग वर्षभर कार्यशील असतोची गटचर्चाविद्यार्थ्यां ., चर्चासत्र व वर्गचाचणी दरवर्षी घेतली जातेतसेच काव्य ., कथा, नाटक, निबंध,लेखन कार्यशाळा आयोजित केली जाते .
- ❖ विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी वक्तृत्व, वादविवाद, निबंध, काव्यवाचन, सुंदर हस्ताक्षर, आयत्यावेळचे भाषण व कथाकथन इत्यादी स्पर्धा मराठी विभागातर्फे घेतल्या जातातदरवर्षी . साठी विकासासाठी व विद्यार्थ्याने मराठी विषयाच्या निमित्तामराठी भाषा गौरव दिनाच्या मराठी विषयाच्या .कार्यक्रमाचे आयोजन केले जाते विद्यार्थ्यामध्ये नेतृत्व गुण यावा त्यांना मराठी विषयातील कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करता यावे यासाठी मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना केली जाते.
- ❖ दि .30/09/2015 रोजी प्रा फुले महाविद्यालयभारत भदाडे महात्मा ., किनगाव यांच्या हस्ते मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.
- ❖ दि. 24/09/2019 रोजी श्री. चंदर टाळकूटे माजी विद्यार्थी व ग्रामपंचायत सदस्य, मष्णेरवाडी यांच्या हस्ते मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.
- ❖ निबंध लेखन, वक्तृत्व, सुंदर हस्ताक्षर लेखन, काव्यवाचन, रांगोळी, चित्रकला इत्यादी विविध प्रकारातील स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी मराठी विभागाने दरवर्षी घेतल्या आहेत.
- ❖ दि. 2/12/2015 रोजी चाकूर तालुकास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेमध्ये रविशंकर स्वामी प्रथम तर कु. पुनम बोडे द्वितीय आली आहे. हे मराठी विभागाचे यश आहे.
- ❖ दि. 11/12/2018 रोजी बाबुजी / गदिमा व पुल या महात्रयीच्या जन्मशताब्दीनिमित्त राज्यस्तरीय लेखन, काव्य व संगीत कार्यशाळा संजीवनी महाविद्यालयात मराठी व सांस्कृतिक विभागातर्फे घेण्यात आली. याला विद्यार्थ्यांचा व समाजातील सर्व रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. समाजाला व विद्यार्थ्यांला लेखन, काव्य व संगीत यांचे परिपूर्ण ज्ञान झाले.

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

- ❖ महाविद्यालयामध्ये दरवर्षी मराठी भाषा गौरव दिन दि. 27 फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. दि. 27/02/2018 रोजी मा. श्रीहरी मुंडे सर या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. त्याचे अध्यक्ष महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. धनंजय चाटे सर हे होते.
- ❖ दि. 01/03/2021 रोजी डॉ. उन्मेश शेकडे, कवी, कादंबरीकार व मराठी विभाग प्रमुख, स्वामी विवेकांनद महाविद्यालय, शिरूर ताजबंद यांनी मराठी राजभाषा गौरव दिन व काव्य वाचन स्पर्धा कार्यक्रमाचे उद्धाटन व अनमोल मार्गदर्शन केले. काव्यवाचन स्पर्धेत प्रथम आटखिळे चंद्रकांत, द्वितीय माकणीकर आदित्य, तृतीय सोमवंशी सुप्रिया हे विद्यार्थी आले.
- ❖ दि. 13/01/2020 रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त सुंदर हस्ताक्षर, निबंध व काव्य वाचन स्पर्धा मराठी विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या विकासासाठी घेण्यात आली. दि. 21/01/2021 रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरावाडा व राष्ट्रीय युवा सप्ताह निमित्त मराठी विभाग व नेहरू युवा मंडळ, लातूर तर्फे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच दि. 24/09/2021 रोजी मराठी विभाग व नेहरू युवा मंडळ, लातूर तर्फे तालुका स्तुरीय भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यात प्रथम मुसळे प्रेमला, द्वितीय बडे बालाजी, तृतीय दत्तनूरे नरसिंग हे विद्यार्थी आले.
- ❖ कोविड -19 काळात महाविद्यालय बंद असल्यामुळे मराठी विभाग व सांस्कृतिक विभागाने ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले. दि. 03/01/2021 रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली. त्यात प्रथम बाबासाहेब गंगाधर कांबळे, द्वितीय 1. आशितोष खाडे 2. अभिलाषा वैश, तृतीय 1. वैष्णवी शिंदे 2. बालाजी केंद्रे या विद्यार्थ्यांने यश संपादन केले.
- ❖ दि. 14/04/2021 रोजी मराठी विभागातर्फे भारतरत्न, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने राष्ट्रीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली. या दोन्ही ऑनलाईन राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेला देशभरातून खूप प्रतिसाद मिळाला.
- ❖ संजीवनी महाविद्यालय व मराठी विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी दि. 28 ते 31 जानेवारी 2021 रोजी झालेल्या ऑनलाईन विश्वमराठी संमेलनामध्ये सहभाग घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व प्राध्यापकांच्या ज्ञानामध्ये खुप मोठी भर पडली. हे मराठी विभागाचे विद्यार्थ्यांच्या व समाजाच्यास विकासासाठी असणारे महत्वपूर्ण कार्य आहे.

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग







मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन दि. 030/09/2015 प्रा.भारत भदाडे

मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन दि. 24/09/2019 श्री.चंदर






तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उद्घाटन व सहभागी विद्यार्थी

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

बाबुजी/ गदीमा व पु.ल. या महात्रयीच्या जन्मशताब्दी निमित्त राज्यस्तरीय लेखन, काव्य व संगीत कार्यशाळा

दि. 11/12/2018









लोकमत

कार्यशाळा... 'बाबूजी-गदिमा-पुलं' या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त लेखन, काव्य व संगीत कार्यशाळेत कलाकारांनी आपली कला सादर करुन मनोरंजन केले.

Hello Latur
Page No. 4 Dec 14, 2018
Powered by: erelego.com







# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## जीवनानुभव समृद्ध करण्यासाठी साहित्य संगीत कलेची साधना आवश्यक!



चापोली - साहित्य, संगीत आणि कला याशिवाय जीवन अपूर्ण आहे. जीवनानुभावाला उजाळा मिळण्यासाठी अशाप्रकारच्या कार्यशाळाची भूमिका ग्रामीण भागात अत्यंत आवश्यक आहे. असे प्रतिपादन लातूर विभागीय मंडळाचे सचिव,सुप्रसिद्ध कवी शशिकांत हिंगोणेकर यांनी केले. सांकृतिक कार्य संचालनालय व चापोली येथील संजीवनी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सुधीर फडके, ग. दि. माडगुळकर आणि पु. ल. देशपांडे या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त लेखन, काव्य व संगीत कार्यशाळेचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नारायणराव चाटे तर प्रमुख पाहुणे म्हणून मकरंद जोशी, मोहन सिरसाट, डॉ. रेणुकादास देशपांडे, रमा नाडगौडा, प्रा. कृष्णा लव्हेकर, प्राचार्य डॉ. धनंजय चाटे, उपप्राचार्य डॉ. भालचंद्र चाटे, विलास सिंदगीकर हे उपस्थित होते. पुढे बोलताना हिंगोणेकर म्हणाले की, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाने ग्रामीण भागात ही कार्यशाळा आयोजित केल्याने बाबूजी, गदिमा आणि पुलं या व्यक्तिमत्वाचा परिचय वेगळ्या अंगाने करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे व्यक्तींच्या जीवनातील रुक्षपणा जाऊन तेथे भावनिक ओलावा निर्माण होण्यास मदत होणार आहे. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी समन्वयक प्रा. नामदेव सोडगीर, प्रा. संदीप मुंढे, प्रा. नितीन आवस्कर, प्रा. डॉ. सचिन चोले, प्रा. विजय गुळवे, प्रा. महेंद्र वळसंगीकर, प्रा. दीपक मोरे, प्रा. डॉ. सुनील गायकवाड, प्रा. नारायण खेडकर,प्रा. डॉ. अतुल धावारे, प्रा. डॉ. माधव कागणे, प्रा. डॉ. महेबूब पठान, प्रा. गौतम बनसोडे, प्रा. नारायण जायभाये, प्रा. विजय ढोले, शेषेराव सोगेवाड, संतोष नागरगोजे, लक्ष्मण कोलेवाड सह आर्दींनी परिश्रम घेतले.








# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

मराठी भाषा गौरव दिन 27-02-2018





मराठी भाषा गौरव दिन 01-03-2021




लोकमत

संजीवनी महाविद्यालयात कार्यक्रम

चापोली येथील संजीवनी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.धनंजय चाटे, डॉ. भालचंद्र चाटे.

Hello Latur
Page No. 3 Mar 05, 2021
Powered by: erelego.com

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

मराठी भाषा संवर्धन  पंधरवाडा





## निबंधलेखन, सुंदर हस्ताक्षर व काव्यवाचन स्पर्धा







# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

कोविड- 19 ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा दि. 03-01-2021





कोविड- 19 ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा दि. 14-04-2021









# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## बी.ए., मराठी पदवी कोर्सचा परिणाम (CO`S)

- ❖ मराठी साहित्यात अभिरूची निर्माण होते.
- ❖ निबंधलेखन, काव्यलेखन, कथालेखन, नाटयलेखन, वक्तृत्व, वाद विवाद, सुंदर हस्ताक्षर इ. प्रकाराची लेखन प्रेरणा मिळते.
- ❖ भाषिक कौशल्याचा विकास होतो.
- ❖ साहित्यातून मूल्यशिक्षणाद्वारे व्यक्तिमत्व विकास होतो.
- ❖ विद्यार्थ्यांची भाषांतर किंवा अनुवाद क्षमता विकसित होते.
- ❖ जनसंवादतंत्र व प्रसारमध्यम क्षेत्रात विद्यार्थ्यांची प्रगती होतो.
- ❖ साहित्य आणि समाज, साहित्य आणि भाषा यांच्यातील परस्पर संबंध समजतील.
- ❖ साहित्य समिक्षेचे कौशल्य प्राप्त करणे व सर्जनशिल लेखनासाठी प्रेरणा मिळेल .

## बी.ए., पदवीचे विशिष्ट परिणाम (PO`S)

- ❖ मराठी भाषा, व्याकरण, भाषाविज्ञान व साहित्यात रस निर्माण होईल.
- ❖ अनुवाद, भाषांतर, अभिनय, प्रसारमाध्यमे व शिक्षक इत्यादी क्षेत्रतील नोकरीच्या संधीचा लाभ मिळेल.
- ❖ विविध साहित्य प्रकाराच्या अभ्यासाबद्दल परिपूर्ण जाणीव जागृती वाढेल.
- ❖ साहित्यिक संशोधनाची वृत्ती निर्माण होईल

## Attainment of Pos and Cos (विद्यार्थ्यांचे यश)

- ❖ विद्यार्थ्यांना कथा, कविता व नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारात लेखन करण्यासाठी प्रेरणा मिळाली.
- ❖ विद्यार्थी प्रसार माध्यमामध्ये नोकरी करू लागले.
- ❖ शिक्षक या पदावर नोकरी करू लागले.
- ❖ अभिनय व राजकारण क्षेत्रात विद्यार्थी कार्यरत झाले.
- ❖ संस्कारक्षम व नैतिकमूल्यसंपन्न विद्यार्थी निर्माण झाला.
- ❖ व्यवसायभिमुख विद्यार्थी निर्माण झाला.

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

### मराठी विभागातील अधिव्याख्याते

| अ.क्र. | प्राध्यापकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | पद | अध्ययन अनुभव |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रा. डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | एम.ए.,बी.एड.,सेट., पीएच.डी. | विभाग प्रमुख व सहा. प्राध्यापक | 21 |
| ०२ | प्रा. डॉ. नामदेव बापूराव सोडगीर | एम.ए.,सेट.,पीएच.डी. | सहा.प्राध्यापक | 21 |

### Orientation Course / Refresher Course/ Short-Term Course / FDP

| अ. क्र | प्राध्यापकाचे नाव | (Orientation Course) | (Refresher Course) | (Short-Term Course) | FDP | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | 01 | 03 | 05 | 03 | 12 |
| २ | प्रा. डॉ. नामदेव बापूराव सोडगीर | 01 | 03 | 05 | 07 | 16 |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## बी.ए./बी.एस्सी/बी.कॉम. मराठी(S.L) विषयाचा निकाल


| अ.क्र. | वर्ष | वर्ग | सरासरी निकाल |
|---|---|---|---|
| 01 | **2015 - 16** | बी.ए.प्रथम वर्ष | 100.% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 88.63% |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 100.% |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 86.82% |
| 02 | **2016-17** | बी.ए.प्रथम वर्ष | 88.23% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 94.37% |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 74 % |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 93.58% |
| | | बी.कॉम.प्रथम वर्ष | 78.57% |
| 03 | **2017-18** | बी.ए.प्रथम वर्ष | 75% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 72% |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 84% |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 95.83% |
| | | **बी.कॉम.प्रथम वर्ष** | 85.71% |
| | | **बी.कॉम.द्वितीय वर्ष** | 95.82% |
| 04 | **2018-19** | बी.ए.प्रथम वर्ष | 79.26% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 72.36% |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 83% |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 77.65% |
| | | **बी.कॉम.प्रथम वर्ष** | 82% |
| | | **बी.कॉम.द्वितीय वर्ष** | 60% |

| अ.क्र. | वर्ष | वर्ग | सरासरी निकाल |
|---|---|---|---|
| 05 | 2019-20 | बी.ए.प्रथम वर्ष | 82.33% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 70% |
| | | बी.एस्सी.प्रथम वर्ष | 82.42% |
| | | बी.एस्सी. द्वितीय वर्ष | 78.33% |
| | | बी.कॉम.प्रथम वर्ष | 84.23% |
| | | बी.कॉम.द्वितीय वर्ष | 79.47% |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

**B.A./ B.Sc./ B. Com. F.Y. & S.Y.  Marathi (S.L.) विषयाचा निकाल व आलेख**





| Year | 2015-2016 | 2016-2017 | 2017-2018 | 2018-2019 | 2019-2020 |
|---|---|---|---|---|---|
| Result | 93 % | 85 % | 84 % | 75 % | 79 % |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## बी.ए. मराठी(Optional) विषयाचा निकाल


| अ.क्र. | वर्ष | वर्ग | सरासरी निकाल |
|---|---|---|---|
| 01 | 2015-16 | बी.ए.प्रथम वर्ष | 85% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 67% |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 80.55% |
| 02 | 2016-17 | बी.ए.प्रथम वर्ष | 90% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 87% |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 88.5% |
| 03 | 2017-18 | बी.ए.प्रथम वर्ष | 85% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 60% |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 96.5% |
| 04 | 2018-19 | बी.ए.प्रथम वर्ष | 65.5% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 63.32% |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 60.57% |
| 05 | 2019-20 | बी.ए.प्रथम वर्ष | 59.78% |
| | | बी.ए.द्वितीय वर्ष | 78.2% |
| | | बी.ए. तृतीय वर्ष | 76.62% |



# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

**B. A. F. Y. / S. Y. / T. Y. Marathi (Optional) विषयाचा निकाल व आलेख**




| Year | 2015-2016 | 2016-2017 | 2017-2018 | 2018-2019 | 2019-2020 |
|---|---|---|---|---|---|
| Result | 77 % | 88 % | 80 % | 63 % | 70 % |


# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## मराठी कौशल्ये विकास – SEC निकाल

| अ.क्र. | वर्ष | वर्ग | सरासरी निकाल |
|---|---|---|---|
| 01 | 2017-18 | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम द्वितीय वर्ष | 100% |
| | | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम तृतीय वर्ष | - |
| 02 | 2018-19 | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम द्वितीय वर्ष | 100% |
| | | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम तृतीय वर्ष | 100% |
| 03 | 2019-20 | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम द्वितीय वर्ष | 91.66% |
| | | बी.ए./बी.एस्सी./ बी.कॉम तृतीय वर्ष | 100% |

### मराठी कौशल्ये विकास – SEC नविषयाचा निकाल आलेख



# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

### विद्यावाचस्पती पदवी (Ph.D.)

| अ.क्र. | प्राध्यापकाचे नाव | संशोधनाचा विषय | विद्यापीठाचे नाव | ॲवार्ड दिनांक |
|---|---|---|---|---|
| 01 | प्रा. डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | मराठी प्रादेशिक कादंबरीचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा (1980 ते 2008) | स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड | जानेवारी 2017 |
| 02 | प्रा. डॉ. नामदेव बापूराव सोडगीर | मराठवाडयातील पहिल्या पिढिची कथा: एक अभ्यास (1930 ते 1960) | स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड | एप्रिल 2019 |

### संशोधनातील योगदान

#### चर्चा सत्र / परिसंवाद/ कार्यशाळा उपस्थिती

| अ.क्र. | विभाग | अंतरराष्ट्रीय | राष्ट्रीय | राज्यस्तरीय | विद्यापीठस्तरीय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | डॉ. व्ही. एस. ढोले | 1 | 6 | 2 | 6 | 15 |
| 02 | डॉ. एन. बी. सोडगीर | 8 | 15 | - | 6 | 29 |

#### चर्चा सत्र / परिषद उपस्थिती शोधनिबंध सादरीकरण

| अ.क्र. | विभाग | अंतरराष्ट्रीय | राष्ट्रीय | राज्यस्तरीय | विद्यापीठस्तरीय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | डॉ. व्ही. एस. ढोले | 1 | 3 | - | - | 4 |
| 02 | डॉ. एन. बी. सोडगीर | 1 | 3 | - | - | 4 |

#### अंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पत्रिकेत प्रकाशित झालेले शोधनिबंध

| अ.क्र. | विभाग | अंतरराष्ट्रीय | राष्ट्रीय | राज्यस्तरीय | विद्यापीठस्तरीय | ग्रंथ संपादक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | डॉ. व्ही. एस. ढोले | 9 | 4 | 2 | 2 | 1 | 18 |
| 02 | डॉ. एन. बी. सोडगीर | 1 | 14 | - | - | - | 15 |

#### संशोधन मार्गदर्शक

| अ.क्र. | विभाग | प्रस्तावित | प्रवेशित | घोषित |
|---|---|---|---|---|
| 01 | डॉ. व्ही. एस. ढोले | 04 | 01 | - |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील कार्य

### डॉ.विजयकुमार शिवदास ढोले

| अ.क्र. | महाविद्यालय स्तरीय | विद्यापीठ स्तरीय |
|---|---|---|
| 1 | परीक्षा विभाग समिती सदस्य 2015-16 ते 2016-17 | पर्यवेक्षण |
| 2 | स्पर्धा परीक्षा मार्गदशर्न समिती सदस्य 15-16 ,16-17, 17-18 | पेपर सेटींग (प्रश्नपत्रिका काढणे) |
| 3 | वेळापत्रक विभाग समिती सदस्य 15-16 , 16-17 ,17-18 , 18-19,19-20 | पेपर तपासणी व नियामक |
| 4 | वुमन सेल सदस्य 2016-17, 17-18, 18-19, 19-20 | दक्षता पथक सदस्य |
| 5 | प्रवेश समिती सदस्य | |
| 6 | सांस्कृतिक विभाग सदस्य | |
| 7 | प्रकाशन समिती 17-18, 18-19, 19-20 | |
| 8 | क्रीडा विभाग समिती 18-19, 19-20 | |
| 9 | SEC Coordination committee 18-19, 1920 | |
| 10 | Feedback समिती18-19, 19-20 | |

### डॉ.नामदेव बापूराव सोडगीर

| अ.क्र. | महाविद्यालय स्तरीय | विद्यापीठ स्तरीय |
|---|---|---|
| 1 | प्रमुख, वाद- विवाद | पर्यवेक्षण |
| 2 | अॅन्टी रॅगींग सेक्रेटरी | पेपर सेटींग (प्रश्नपत्रिका काढणे) |
| 3 | अंतर्गत परीक्षा पर्यवेक्षक | पेपर तपासणी व नियामक |
| 4 | सांस्कृतिक विभाग सदस्य | |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

### मराठी विभागाचे यश

- ✓ कु. सलगर मनिषा सुधाकर ही विद्यार्थीनी मराठी विषयात स्वा. रा.ती. म. विद्यापीठात प्रथम.
- ✓ प्रतिवर्षी मराठी विषयाचा उज्वल निकाल .
- ✓ विविध कलाप्रकार व स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग व पुरस्कार .
- ✓ प्रा. विजयकुमार शिवदास ढोले यांना २०१५-२०१६ चा महाविद्यालयाचा पुरस्कार .
- ✓ प्रा. विजयकुमार शिवदास ढोले यांना २०१७ चा महात्मा ज्योतिबा फुले राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार.
- ✓ भारतरत्न डॉ. राधाकृष्णन गोल्ड मेडल ऑवार्ड – 24 जुलै 2021

### मराठी विभागाचे यश





महाविद्यालयातील कु. सलगर मनिषा सुधाकर ही विद्यार्थीनी बी.ए. मराठी ऐच्छिक विषयात स्वा.रा.ती.म.विद्यापीठात सर्वप्रथम आल्याबद्दल मा.कुलगुरू श्री. सर्जेराव निमसे, मा. कुलगुरू श्री. ठाकरे, कुलसचिव श्री. राम वाघ यांच्या हस्ते प्रो. बी.डी.वाडेकर पुरस्कार स्विकारतांना कु. सलगर मनिषा, संस्थेच सचिव श्री. नारायण दौलतराव चाटे, प्राचार्य डॉ. धनंजय चाटे, प्रा. नामदेव सोडगीर व प्रा. श्रीहरी वेदपाठक

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## मराठी विभागातील माजी विद्यार्थ्यांची यादी

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पद | मो.नं. |
|---|---|---|---|
| 1 | श्रीमंगले उमाकांत बालाजी | व्यापार | 8412842135 |
| 2 | पिटले सोनाली व्यंकटराव | कंपनी ऑपरेटर | 7709758823 |
| 3 | आलमले स्वाती रत्नाकर | ब्युटी पार्लर | 9857426321 |
| 4 | डोंगरे रविकांत वैजनाथ | शेती | 9637107427 |
| 5 | देशमुख प्रिया रवि | गृहिणी | 8275453272 |
| 6 | सुळ विठ्ठल कोंडीबा | एलएलबी | 9423856969 |
| 7 | गणाचार्य महेश त्र्यंबक | व्यवसाय | 9822329286 |
| 8 | धावड नरसिंग तुकाराम | पोस्टमन | 7507274982 |
| 9 | होनराव पुजा व्यंकटराव | M.A.B.Ed. Mar | 8830164781 |
| 10 | चाटे नागनाथ बाबुराव | शेती | 9975832008 |
| 11 | कोरे बाळू त्र्यंबक | क.लिपीक | 9860107179 |
| 12 | कांबळे विशाल विजय | MBA Latur | 9730631673 |
| 13 | करडखेले मन्मथ केरबा | M.A. Marathi | 8698653433 |
| 14 | पडीले नरेंद्र विजयकुमार | व्यापार | 8308152345 |
| 15 | सोमवंशी अंजली दिलीप | गृहिणी | 7083478762 |
| 16 | बावगे रूपाली हवाप्पा | क्लासेस | 9552954001 |
| 17 | चिंते विवेक गंगाधर | MSEB क्लर्क | 9561944722 |
| 18 | भालेराव अभिजीत तातेराव | कंपनी | - |
| 19 | कदम प्रियंका गणपत | क्लासेस | 8975507597 |
| 20 | राजुरे दयानंद वैजनाथ | पुणे कंपनीत | 9767974037 |

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पद | मो.नं. |
|---|---|---|---|
| 21 | शेवाळे सोमनाथ नरसिंग | मो.दुकान | 9403250925 |
| 22 | थावरे ज्ञानेश्वर रामकिशन | शेती | 7588581932 |
| 23 | कवठे तुकाराम बालाजी | कि.दुकान | 9823221546 |
| 24 | माने महादेवी विजय | गृहिणी | 8975893102 |
| 25 | भालेराव धनाजी रघु | HDFC F | 8698399639 |
| 26 | भालेराव अक्षय अंगद | कं.ऑपरेटर | 8698399639 |
| 27 | मुकनर संभाजी गंगाधर | लाईट फी. | 8308634141 |
| 28 | सातापुरे सुप्रिया पांडूरंग | M.A. Mar | 9421372100 |
| 29 | फुलारी बालाजी सुरेश | MA. Pol. | 9422543411 |
| 30 | येणगे रोहीणी कमलाकर | गृहिणी | 9765659957 |
| 31 | शेख शदुल सरवरसाब | व्यापार | 9764168226 |
| 32 | घुगे नम्रता भास्करराव | MA. Pol | 9850625682 |
| 33 | येरमे कृष्णा देविदास | MA.mar | 8975547697 |
| 34 | आवळे अनिल राजेंद्र | MA mar | 9860125913 |
| 35 | मूकनर पांडूरंग व्यंकटी | MA mar | 9765100060 |
| 36 | हाक्के गणपत मधुकर | स्पर्धा प. | 8888653259 |
| 37 | वाघमरे धोंडीराम शेषेराव | ग्रा.सेवक | 9975721404 |
| 38 | शिंदे शेखर आबासाहेब | शेती | 9665208151 |
| 39 | राठोड अमोल विश्वनाथ | कंपनी | 9421909305 |
| 40 | कोरे रामदास दत्तात्रय | बँक | 9011932558 |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

### मराठी विभागातील माजी विद्यार्थ्यांची यादी

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पद | संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| 41 | पोलावार काशिनाथ ज्ञानोबा | व्यापार | 7743804977 |
| 42 | कांबळे मधुकर बाबुराव | कंपनी | 9960755649 |
| 43 | गलाले कोमल व्यंकटराव | कंपनी | 8421522618 |
| 44 | वाघमारे आशा रघुनाथ | गृहिणी | 9423900669 |
| 45 | मुकणर कृष्णा शेषेराव | व्यापार | 7218234643 |
| 46 | कवडे शिवलिंग अशोक | कंपनी ऑ. | 7378397356 |
| 47 | कंदाकुरे नरेंद्र दत्ता | कंपनी | 9011999901 |
| 48 | पांढरे दयानंद हरीपाल | कंपनी लिपीक | 9096700779 |
| 49 | कदम संकेत रामप्रसाद | नोकरी | 8888454667 |
| 50 | जाधव विजय तुकाराम | M.A. Mar | 9763206263 |
| 51 | पाझळे सुनिल रोहीदास | खेळाडू | 8830917292 |
| 52 | खरात जय नानासाहेब | खेळाडू | 8308903255 |
| 53 | नागरगोजे योगेश विश्वनाथ | कंपनी नोकरी | 9604005210 |
| 54 | गायकवाड मिलींद माणिकराव | कंपनी नोकरी | 9673122313 |
| 55 | भंडे सुरेखा गोविंदराव | M.A. Marathi | 9869814846 |
| 56 | भरडें रामदास बापूराव | कंपनी पुणे | 7796198163 |
| 57 | धडे मारोती विश्वनाथ | M.A. | 8888445133 |
| 58 | बिराजदार अनिल अप्पासाहेब | कोल्हापूर कंपनी | 9823398100 |

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## मराठी विभागाचे सामर्थ्य , उपलब्ध क्षेत्र, कमजोरी व आव्हाने

### सामर्थ्य / बलस्थाने

- कोविड-19 काळात ऑनलाईन अध्यापन व अध्ययन .
- उज्वल निकाल व गुणवत्तापूर्ण व प्रशिक्षित अध्यापक वर्ग
- भाषिक कौशल्याचे संपूर्ण ज्ञान दिले जाते .
- स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांना प्रेरणा.
- विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास व नैतिकमूल्याचे शिक्षण.
- अध्यायन वअध्यापनात आधुनित तंत्र साधनांचा वापर.
- लोकप्रिय लेखक व साहित्यिकांचे मार्गदर्शन
- विभागातील उत्तम सहाकर्य

### उपलब्ध क्षेत्र :-

- पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- चित्रपट व नाटय अभिनय मार्गदर्शन व संधी
- काव्य व कथालेखन मार्गदर्शन
- प्रसार माध्यमात संधी

### कमजोरी

- आर्थिक दुर्बल असलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकांचे नैराश्य .
- ऑनलाईन अध्यापनात ग्रामीण भागात मोबाईल नेटवर्क प्रॉब्लेम.
- भाषा प्रयोगशाळेची आवश्यकता.
- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मनातील स्पर्धा परीक्षेची भिती.

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

### आव्हाने

- ❖ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकांचे नैराश्य दुर करणे .
- ❖ऑनलाईन अध्यापनासाठी मोबाईल नेटवर्कची सुविधा निर्माण करणे .
- ❖विद्यार्थ्यांची आर्थिक अडचण व पालकाचे नैराश्य

### मराठी विभागातील भविष्यातील नियोजन(उपलब्ध संधी)

- ✓ मराठी विषयांचे  भिंतीपत्रक काढणे .
- ✓ भाषा प्रयोगशाळेची उपलब्धता करून देणे.
- ✓ नवलेखक व समीक्षकासाठी कार्यशाळा घेणे.
- ✓ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करणे.
- ✓ विद्यार्थ्यासाठी सहलीचे आयोजन करणे.
- ✓ विद्यार्थ्यांना  संशोधनासाठी मार्गदर्शन करणे.
- ✓ गरीब व हुशार विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे .
- ✓ कवी, लेखक व अभिनेता यांची भेट विद्यार्थ्यांसमवेत घडविणे.

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

# *PHOTO GALLERY*



# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

मराठी भाषा गौरव दिनानमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे उद्धाटन संस्थेचे सचिव श्री. नारायण चाटे साहेब 2016







वकतृत्व काव्य वाचन व निबंध स्पर्धा







# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग

## चर्चासत्र







**कवी नारायण सुमंत, इंद्रजीत भालेराव व भारत सातपुते यांची महाविद्यालयास भेट**





# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग





**प्रा. डॉ. विजयकुमार ढोले यांचे व्याख्यान व संपादित काव्य**





# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग







प्रा. डॉ. विजयकुमार ढोले यांचे व्याख्यान व संपादित काव्य








# मराठी विभाग






## प्रा. डॉ. विजयकुमार ढोले यांचे व्याख्यान व संपादित काव्य



### बाप

परिचय : प्रा. विजयकुमार ढोले
संजीवनी महाविद्यालय चापोली ता. चाकूर येथे अध्यापक, नवोदित कवी.

मिरगाच्या पाण्याची
वाट बघता बघता
जीव खाली-वर व्हायचा
आवंदा तरी,
कर्ज फिटल म्हणून
बाप सारखा
आभाळाकंड बघत राह्यचा
दिसरात काम करून
बाप 'आजारी' पडायचा
दवाखान्याला पैसा नाही
म्हणून .....
बरेपणाच सोंग करायचा
मिरगाच पाणी पडलकी
बापाला तरतरी यायची
पेरणीच्या कामामध्ये
जेवणाची सय नाही राहयची
काम करता करता
दिस कमी पडायचा
शुक्राच्या चांदणीची वाट पाहत
बाप जागीच रहायचा
कष्टानं बापाच्या
रान हिरवगारं व्हायचं
पाहून बापाला
पिकं डूलतचं राहयचं
बापाच्या कष्टाला





मायचा आधार रहायचा
आनंदाच्या जीवनाला
पारावर नाही उरायचा
पशुपक्ष्याच्या किलबिलाटात
बाप 'बोलका' व्हायचा
त्यांच्यासाठी काही धान्य
खास 'राखून' ठेवायचा
पिकाच्या आशेवर
बाप सारखा जगायचा
पोरीच्या लग्नाच स्वप्न
बाप हरघडी बघायचा
बापाच्या कष्टाला
निसर्ग साथ नाही द्यायचा
तरीसुद्धा बाप माझा
धीर नाही सोडायचा
कसबसं रास करुन
बाप धान्य घरी आणायचा
कर्जबाजारी असूनसुद्धा
बलुतेदारांना वाटायचा
बाजारात गेल्यावर
मालाला भाव नाही रहायचा
माल विकण्याअधिच सावकार
'उचल' घेऊन जायचा
पोरीचा विचार करुन
जीव चेंदामेंदा व्हायचा
कष्ट करुन बाप मात्र
रिकामाच रहायचा

◆◆

# संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर

## मराठी विभाग



### देहगुढी

कर्जाने खचलेल्या बापानी
मागच्या साली याच दिशी
आपल्या देहाची गुढी
वठलेल्या कडुनिंबाला बांधली...
तेव्हा
आख्खा गाव
गुढी पहायला जमला होता...
......
भाषणरुपी आश्वासनांचे नैवेद्य
आम्हाला दाखवून
बापाच्या देहगुढीचे
दर्शन घेत
प्रत्येकाने बापाच्या तोंडात
कडुनिंबाचा पाला कोंबला
अन्
चायपाणी
आपापल्या घरी
कडु घास काढण्यासाठी
पुरणपोळी खायला निघून गेले...
ते अजूनही तिकडेच आहेत...
......
आता मी मात्र
त्या झाडाखाली
बसून आहे...
पुन्हा त्या झाडाला
कुणीही स्वत:ची
देहगुढी
उभारु नये म्हणून...

–हनुमंत चांदुगडे, सुपे(बारामती)
मो.९१३०५५२५५१

### जात

जातीसाठी माणूस नसतो । ना माणसासाठी जात ।।
माणसाने माणूस व्हावे । हीच आमची आस ।।धृ।।
जात नावाच्या मद्यामध्ये
माणूस गुंगत असतो
माणूस जात खातो
माणूस जात पितो
पीता–पीता माणूस हा । जातीत बेहोश होतो ।।
जातीसाठी माणूस नसतो । ना माणसासाठी जात ।।
माणसाने माणूस व्हावे । हीच आमची आस ।।१।।

जातीच्या या माणसाला
कुठेच नसतो थारा
उठता बसता म्हणतो कसा?
जात माझी पाळा
जातीच्या या माणसाने । माणूस दूर केला ।।
जातीसाठी माणूस नसतो । ना माणसासाठी जात ।।
माणसाने माणूस व्हावे । हीच आमची आस ।।२।।


माझी जात तुझी जात
माणूस म्हणतो कसा?
काळा गोरा भेद करुनी
भांडत बसतो जसा
जरी वेगळा माणूस परी । रक्त एकच हाय ।।
जातीसाठी माणूस नसतो । ना माणसासाठी जात ।।
माणसाने माणूस व्हावे । हीच आमची आस ।।३।।


ना श्रेष्ठ असते जात
ना कनिष्ठ असते जात
माणुसकीच्या जातीशिवाय
नसते कोणती जात
जातीच्या या माणसांनो। माणुसकीला पाळा ।।
जातीसाठी माणूस नसतो । ना माणसासाठी जात ।।
माणसाने माणूस व्हावे । हीच आमची आस ।।४।।

माझा तुझा मसणवटा
नसते असे काही
जरी वेगळा मसणवटा
जमीन वेगळी नाही
माणसाने माणूस व्हावे। जात वेगळी नाही।।
जातीसाठी माणूस नसतो । ना माणसासाठी जात ।।
माणसाने माणूस व्हावे । हीच आमची आस ।।५।।

–प्रा.डॉ.विजयकुमार ढोले, चापोली(लातूर)
मो.८७८८८५९६००

दिवाळी-२०१९ १४३



प्रा. डॉ. विजयकुमार शिवदास ढोले
दि. ०९/०६/७७
संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर जि. लातूर येथे मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. मराठी प्रादेशिक कादंबरीचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा (इ.स. १९८० ते २००८) पर्यंत कालखंड या विषयावर Ph.D. चे संशोधन केले आहे.
मु. सावरगांव (थोट) ता. अहमदपूर जि. लातूर – ४१३ ५१४
मो. ९९७५४७१५७४

### ● माणसांचे रंग ●

माणसांचे रंग वेगळे
माणसांचे ढंग वेगळे
माणसात माणसाला
'माणूस' शोधणे वेगळे
माणसांचे चेहरे वेगळे
माणसांचे डोळे वेगळे
माणसांच्या अंतरंगातले
माणसांचे 'इशारे' वेगळे
दाखवायचे दात वेगळे
खावयाचे दात वेगळे
माणसांच्या डंखाचे
माणसांचे 'विष' वेगळे
माणसांच्या रंगातले
माणसांचे भाव वेगळे
रंगातल्या माणसाने
माणसालाच हो गिळले
माणसांची जात वेगळी
माणसांची वाट वेगळी
प्रेमाच्या माणसाची
माणुसकीच हो वेगळी

काव्यविश्व / ३६

### ● ओळख ●

ओळख नव्हती म्हणून तर
ओळख केली
माझी नाही पण
तिची तर चिट्ठी आली
चिट्टी पाहण्याची ओढ मला लागली
दंग झालो चिट्टी (चिट्ठी) पाहता
काय होते त्यात मित्रा
तर त्यात,
तिच्या सौंदर्याचा आरसा नव्हता
वरवरची आव्हाने नव्हती
प्रेमाची गाणी नव्हती
नक्षत्राचे रंग नव्हते
वातावरणाचा तमाशा नव्हता
लग्नाची बेडी नव्हती
मी पणाचा भाव नव्हता
सौंदर्याचा अभिमान नव्हता
केव्हातरी द्यावयाची वचने नव्हती
पळून जाण्याचा विचार नव्हता
नुसताच कोरा कागद होता
तोच प्रेमाचा पुरावा होता
शब्द नसले तरी तो
कोऱ्या पानाचा आलेख होता
त्यातून तिच्या मनाचा वेध घ्यायचा होता
तिच्या जीवनाचा अर्थ लावायचा होता
सर्व काही ओळखायचं होतं
मनातल्या मनात सांगायच होत
कारण तिन कधी माझ्यावर
प्रेम केलच नव्हतं
हा माझा नुसताच भास होता.

⁕

काव्यविश्व / ३७

# THANK YOU

## धन्यवाद !

